भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक ०६.११.२०१९ ते १०.११.२०१९)

अंक ८९/२०१९ | दिनांक ०५.११.२०१९ | कालावधी ५ दिवस

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (३०/१०/२०१९ ते ०५/११/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०६/११/२०१९ ते १०/११/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/१० | ३१/१० | ०१/११ | ०२/११ | ०३/११ | ०४/११ | ०५/११ | दिनांक | ०६/११ | ०७/११ | ०८/११ | ०९/११ | १०/११ |
| ०.० | ०.० | ३.२ | ०.० | ०.० | ३२.४ | ०.० | पाऊस (मि. मी) | १५ | ८ | ० | ० | ० |
| ३६.५ | ३४.५ | ३४.० | ३३.० | ३३.५ | ३५.० | ३५.० | कमाल तापमान (अं. से) | ३६ | ३५ | ३३ | ३३ | ३५ |
| २१.० | २५.० | २४.० | २४.५ | २३.० | २२.० | २४.५ | किमान तापमान (अं. से) | २४ | २३ | २२ | २२ | २२ |
| निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ — मेघाच्छादन (ऑक्टा.) | ५ | ७ | ६ | १ | २ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार — मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ८१ | ७० | ९० | ८४ | ९१ | ९२ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८३ | ८५ | ८७ | ८७ | ८५ |
| ५१ | ५५ | ६० | ६६ | ५५ | ६२ | ६० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७६ | ७८ | ८० | ८० | ८० |
| ३.१ | १.७ | २.३ | ४.२ | २.२ | ०.९ | १.० | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००५ | ००४ | ००४ | ००५ | ००६ |
| स्थिर | ईशान्य | आग्नेय | आग्नेय | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ — वा-याची दिशा | आग्नेय कडून | आग्नेय कडून | पूर्वे कडून | ईशान्य कडून | ईशान्य कडून |
| स्थिर | आग्नेय | आग्नेय | दक्षिण | आग्नेय | पश्चिम | आग्नेय | दुपार — वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४५९१.० | ४५९१.० | ३५.६ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यात हलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता असुन वा-याचा वेग वाढण्याची शक्यता आहे.

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | काढणी | येत्या ५ दिवसामध्ये जिल्ह्यामध्ये हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असुन वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे शक्यतो भात कापणी करण्याचे टाळावे. पाउसाचा अंदाज पाहून सकाळच्यावेळी भात कापणी करावी. तसेच कापलेल्या पेंड्या झाकुन ठेवाव्यात.<br>भात खाचरातुन पाणी काढून देण्याची व्यवस्था करावी. जेणेकरुन पाऊसाचे पाणी खाचरात साचणार नाही व पाऊसामुळे लोळण झालेले पिक सडणार नाही किंवा लोंबीतील बियांची ऊगवण होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>भात कापणीसाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या “वैभव विळ्याचा” वापर करावा जेणेकरुन भात जमिनीलगत कापले जाईल. |
| भुईमुग | आरा ते शेंगा | काही ठिकाणी भुईमुग पीक तयार होण्याच्या अवस्थेत आहे. साधारणपणे भुईमुगाची काढणी करताना शेंगेवरच्या शिरा ठळक दिसतात. शेंग दाबल्यावर टणक लागते. टरफल आतल्या बाजुने काळसर होते. तसेच दाण्याच्या रंगात बदल होतो. रोपांवरील कमीत कमी ८० टक्के शेंगा तयार झाल्यावर भुईमुगाच्या काढणीस सुरुवात करावी. व शेंगा स्वच्छ धुवून चांगल्या प्रकारे वाळवाव्यात.<br>पिक तयार झालेल्या ठिकाणी पाउसाचा अंदाज पाहून काढणी करावी. त्याचबरोबर पिकातुन पाऊसाच्या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करुन द्यावी. जेणेकरुन शेंगा कुजणार नाहीत. |
| कुळीथ व चवळी | पेरणी | लांबलेल्या मान्सुनोत्तर पाऊसामुळे भात पिकाची काढनी झालेल्या ठिकाणी रब्बी पिकांच्या पेरणीपुर्व तयारीची कामे हाती घेण्यात यावीत.<br>कुळीथाची व रब्बी हंगामातील चवळी पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी.<br>पेरणीसाठी दापोली - १ व कोकण सदाबहार, कोकण सफेद या अनुक्रमे कुळीथ व चवळी या पिकाच्या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>कुळीथ व चवळी पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः कुळीथासाठी प्रती हेक्टरी १८ ते २० किलो व चवळीसाठी प्रती हेक्टरी १५ ते १८ किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. कुळीथासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश व चवळीसाठी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| कडवा वाल | पेरणी | पिकाची पेरणी ऑक्टोबर व नोव्हेंबर मध्ये ३०x१५ सेमी किंवा ३०x२० सेमी किंवा ३०x३० सेमी या अंतरावर नांगरा पाठोपाठ करावी.<br>पेरणीसाठी पिकाच्या कोकण वाल -१ व कोकण वाल -२ या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>पाभरीणे पेरणी केल्यास साधारणतः प्रती हेक्टरी ५० ते ६० किलो बियाणे पुरते. बियाण्यास प्रती किलोस ३.० ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी.<br>पिकास ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत बियाण्याखाली साधारण ५ सेमी खोलीवर द्यावी. |
| आंबा | पालवी | लांबलेल्या मान्सुनोत्तर पाऊसामुळे आंबा पालवीवर तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिलि प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| काजु | पालवी पुर्व | काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये जुन्या व रोगट फांद्या कापल्यानंतर त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| महा चक्रिवादळ | अति तीव्र स्वरुपाचे | अतिशय अति तीव्र स्वरुपाचे महा चक्रिवादळ उत्तर अरबी समुद्रात घोंगावत असुन ते उत्तरेकडे सरकत आहे.<br>महा चक्रिवादळ ७ नोव्हेंबर सकाळच्या वेळी ७० ते ८० किमी प्रती तास एवढ्या वा-याच्या वेगाने गुजरात किनारी धडकण्याची शक्यता आहे. अरबी समुद्राची स्थीती खवळलेली असल्याने मच्छीमारांनी खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी जाऊ नये. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ऑफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)